
ISSN: 2393-8900 IMPACT FACTOR : 2.7825(UIF) VOLUME - 5 | ISSUE - 12 | AUG - 2019

HISTORICITY RESEARCH JOURNAL

# प्राज्ञपाठशाळा आणि तिची कामगिरी

प्रा. संतोष शेलार
इतिहास विभाग , कर्मवीर आबासाहेब तथा ना. म. सोनवणे महाविद्यालय सटाणा .

**प्रस्तावना:**



महाराष्ट्रातील प्रबोधन परंपरेत प्राज्ञपाठशाळेला एक विशिष्ट स्थान आहे . २० व्या शतकात ज्यांनी धर्मसुधारणेत मोलाची भर घातली त्यात प्राज्ञपाठशाळेचा समावेश होतो. अध्ययन, अध्यापन, ग्रंथलेखन, चर्चा, त्यातून उद्भवलेले वादविवाद, धर्मपरंपरांची पुनर्मांडणी, धर्मसुधारणा क्षेत्रातील प्रत्यक्ष कार्य या दृष्टीने प्राज्ञपाठशाळेचे काम मोलाचे ठरते.

प्रारंभिक काळात प्राज्ञपाठशाळेवर मुख्यत: राष्ट्रवादाचा प्रभाव होता. नंतरच्या काळात मात्र विविध वैचारिक धारा त्यावर प्रभाव टाकू लागल्या. विनोबा भावे काही दिवस येऊन राहिले. तोपर्यंत तर्कतीर्थांना इंग्लिश येत नव्हते . तेव्हा त्यांचे वय ३० वगैरे असेल . तर्कतीर्थांनी विनोबांजवळ इंग्लिशचे धडे घेतले. [i] तर्कतीर्थांसारख्या नव्या दमाच्या विद्यार्थ्यांनी तेथे आगरकरांचा विचार रुजवण्यास सुरुवात केली. [ii] तळेगाव दाभाडेला एक स्कूल होते. क्रांतिकारी लोकांनी सुरु केलेले ते विद्यालय होते. इंग्रजांनी ते बंद पाडले. त्यामुळे शिकविणारे लोक व शिकणारे लोक प्राज्ञपाठशाळेत आले. [iii] त्यामुळे तो राष्ट्रवाद अधिक तीव्र झाला . धर्मशास्त्रावरचे सुरु केलेले काम ही केवळ ॲकॅडेमिक कृती नाही. त्या कृतीमागे एक हेतू आहे की, आपला धर्म काळानुसार बदलत गेला आहे हे समाजाच्या निदर्शनास आणायचे . व तो पुढे सुद्धा बदलत गेला पाहिजे अशी भूमिका घेणे . तिथे आपल्याला असे दिसते की, २५-२६ सालापासून ही जी मंडळी काम करत आहेत, त्यात महादेवशास्त्री दिवेकर, कोकजेशास्त्री, लक्ष्मणशास्त्री जोशी, दिनकरशास्त्री कानडे ही मंडळी आहेत. ही मंडळी इतर पंडितां बरोबर वाद घालू लागली. आपल्याकडे वादाची संकल्पना व परंपरा पूर्वापार होती. त्या मंडळींचे म्हणणे असे होते की, धर्म हा परिवर्तनशील आहे आणि तो परिवर्तनशीलच राहिला पाहिजे.

नंतरच्या काळात प्राज्ञपाठशाळेतल्या या पुरोगामी पंडीत मंड ळींनी १९२५ साली एक काम हाती घेतले, ते म्हणजे धर्मकोशाचे काम. त्या धर्मकोशाचे एकूण ११ कांड आहेत. म्हणजे वर्णाश्रमकांड, व्यवहारकांड, मोक्षकांड, राजनीतीकांड अशी. आणि प्रत्येक कांडाचे किमान ५-६, ५-६ भाग आहेत. त्यातले आतापर्यंत पाच कांडांतील मिळून १७ भाग लिहून झाले आहेत. [iv] अद्याप तो प्रकल्प पूर्ण व्हायचा आहे. आणि अद्ययावत जी माहिती मिळाली आहे, ती अशी आहे की, आत्ता तसे काम करणारे शास्त्री पंडीत मंडळी उपलब्ध नसल्यामुळे ते काम जरा थांबले आहे. हे काम करण्यामागे सर्वात जबरदस्त प्रेरणा काय होती ? ती अशी होती की, तुम्ही जे सांगताय की, तुमची सर्व शास्त्रं सनातन आहेत, हे खरे नाही. ती शास्त्रं काळानुसार बदललेली आहेत. प्रसंगी परस्पर विरोध आलेला आहे. प्रसंगी पूर्ण उलटे वळण घेतले आहे. त्यामुळे हे सर्वच संस्कार किंवा हे सर्वच कर्मकांडे किंवा या सर्वच चालीरीती सनातन आहेत, असा दावा करणे व्यर्थ आहे. अशी या परंपरेने भूमिका घेतली.

मग आताच्या काळात आपल्या धर्मात कुठल्या कुठल्या बाबत परिवर्तन झाले पाहिजे, याविषयी या लोकांनी काही भूमिका घेतल्या आणि वादाला सुरुवात झाली. उदा. १९२६ ला सोनगिरी येथे एक परिषद झाली. तर ती ब्राम्हण परिषद होती. तिथे एक वाद-विवाद घडला. त्या वाद-विवादाचा मूळ हेतूच असा होता की, आपला धर्म परिवर्तनशील आहे का? पारंपरिक शास्त्री मंडळी एका बाजूने उभी राहिली आणि प्राज्ञपाठशाळेची शास्त्री मंडळी दुसऱ्या बाजूला. या प्राज्ञपाठशाळेच्या शास्त्री मंडळींचे म्हणणे असे की , शाश्वत मूल्ये आहेत, नाही असे नाही. सगळे बदलणे आवश्यक नाही . उदा. अहिंसा हे शाश्वत मूल्य आहे . त्यात बदल करता येणार नाही. किंवा सर्वभूतहितरती

शाश्वत मूल्य आहे, त्यात बदल करता येणार नाही. किंवा पूर्वी बदल झाला आहे असे दाखवता येणार नाही. म्हणजे येथे जो मूळ वाद होता, हा मूळ शास्त्रांचा अर्थ 'समन्वयवादी' पद्धतीने लावायचा की 'ऐतिहासिक' पद्धतीने लावायचा, या मुद्द्यावर हा वाद लढला गेला. आणि त्यात लोकांची भांडणे वगैरे झाली. म्हणजे लोकांचे स्वर चढले. मग त्यातून अगदी तीव्र वातावरण झाले आणि तेथे ते कसेब से मिटवले गेले.[v] कारण हे पहिल्यांदाच या पारंपारिक शास्त्री मंडळींनी ऐकले होते की शास्त्रांचा अर्थ लावण्याची अशी काहीतरी ऐतिहासिक पद्धती असते. त्यानंतर परत एक २७ साली परिषद झाली, त्यात पण वाद झाला. पहिल्या परिषदेत त्यांनी एकच मुद्दा मांडला होता की, धर्म परिवर्तनशील आहे. व दुसरा मुद्दा समाजात फक्त दोनच वर्ग आहेत. ब्राम्हण व शुद्र. मधले वर्ग आता शिल्लक नाहीत. प्राज्ञपाठशाळेतल्या पंडितांनी अशी भूमिका घेतली की हे चुकीचे आहे. समाजात चारही वर्ग शिल्लक आहेत. या परिषेदेत यांनी असा स्टँड घेतला की सर्वच वर्णांना वेदांचा अर्थ समजण्याची , वेद शिकण्याची आणि वेदांचे रुपांतर करण्याची परवानगी असली पाहिजे . त्यावरून पुन्हा वाद होऊ लागले. एक मुद्दा असा होता की, अपौरुषेय जे म्हणता आहात ते अपौरुषेयत्व आम्हाला मान्य नाही. वेद हे मनुष्यकृत आहेत. ती माणसे मोठी असतील, पवित्र असतील, पण वेद अपौरुषेय आहेत हे आम्हाला मान्य नाही. पुन्हा याच परिषदेत समुद्रबंदी जी होती, असे समुद्र पर्यटन एखाद्याने केले तर त्याला प्रायश्चित घ्यावे लागे, ते प्रायश्चित आम्हाला मान्य नाही. १९२७ च्या परिषदेत एक मुद्दा असा सांगितला गेला, आता असे सांगितले की जरी वर्ण असले तरी सर्व वर्ण समान आहेत. म्हणजे अमुक वर्ण वरिष्ठ आहे आणि तमुक वर्ण कनिष्ट आहे , हे तत्त्वत:च आम्हाला अमान्य आहे. असे या लोकांनी घोषित केले आणि अर्थातच त्याचा वाद व्हायचा तो झाला. तो होणारच होता. आणि भरपूर वाद-विवाद झाला.[vi] येथून पुढच्या काळात यांच्या असे लक्षात आले की आपले स्वत:चेच मंडळ असले पाहिजे. म्हणून त्यांनी एक मंडळ स्थापन केले. त्याचे नाव 'तत्त्वनिष्ट परिवर्तनवादी परिषद' त्याच मंडळाचे परत नामांतर झाले. 'धर्म निर्णय मंडळ' असे.[vii] त्याच्या वेगवेगळ्या परिषदा झाल्या. त्याचे काम असे होते की, ज्या गोष्टीसाठी समाजात वाद सुरु आहेत. त्या वादावर आपण काहीतरी भूमिका घेतली पाहिजे आणि ती भूमिका बरोबर कशी आहे, हे शास्त्रांच्या सहाय्याने पटवून दिले पाहिजे. म्हणजे हे आधी पण ते करतच होते. उदा. १९३२ चीच गोष्ट आहे, काय झाले गांधीजी तर येरवड्याच्या तुरुंगात होते, ते अस्पृश्यता निवारण्याची चळवळ करू इच्छित होते. त्यासाठी त्यांनी मोठो पंडीतांची सभा बोलावली. मग ती सगळ्या बाजूंच्या पंडीतांची सभा होती. की ज्यांना अस्पृश्यता मान्य आहे, ते बोलावले, ज्यांना अस्पृश्यता मान्य नाही, ते पण बोलावले. म्हणजे गांधीजींनी हे एकदाच केले, असे नाही. बऱ्याचवेळा केले. मग अस्पृश्यता आम्हाला अमान्य आहे, असे म्हणणारा पंडीतांचा गट हाच होता. दुसरे कोणी येत नव्हते. आणि गांधीजींना अशा गटाची आवशकता होती. कारण गांधीजींना काय धर्मशास्त्राचे जाणकार नव्हते. मग धर्मशास्त्रांच्या सहाय्याने आपल्या बाजूने बोलणारे कोणीतरी गांधीजींना हवे होते, म्हणून गांधीजींनी त्यांना बोलाऊन घेतले. आणि मग कधी कधी वाद झाले, कधी कधी नाही झाले. उदा. पहिल्यांदा जेव्हा हे गेले, तर्कनिष्ठ तर वादच झाला नाही. याला कारण असे असते की वादात असे ठरवा वे लागते की कुठले ग्रंथ प्रमाण आहेत, कुठले ग्रंथ अप्रमाण आहेत. कुठले ग्रंथ वादात घेत ले जाणार व कुठले ग्रंथ घेतले जाणार नाही. त्याची प्रतिज्ञा असते. म्हणजे प्रत्येक गोष्ट आधी निश्चत स्वरुपात असे. लिहिलेल्या प्रमाणे वागणे याला प्रतिज्ञा म्हणतात. आणि नियम काय असावेत, कोणी काय बोलावे, याचे नियम असत, त्याला 'समय' म्हणत. तर विषय ठरवताना फक्त गोंधळ झाला. तो विषय असा होता की, अस्पृशांना मंदिर प्रवेश असावा किंवा त्यांना पंक्तीला बसवून घ्यावे का? किंवा अस्पृश्यता एकूणच पाळायची की नाही? तर तर्कतीर्थांनी यात शब्दाचा बदल सुचविला ते म्हटले की , सध्याची जी अस्पृश्यता आहे, ते अस्पृश्य खरे अस्पृश्य आहेत का? असा आपला प्रश्न असला पाहिजे. आणि त्याची खोच शास्त्री मंडळींना लक्षात आली आणि ते वाद न करताच निघून गेले. परत पुढच्या वर्षी त्यांचा वाद झाला. या वादाची गोम काय होती, शास्त्रात जे अस्पृश्य मानले गेले, स्मृती मध्ये विशेषत: असे म्हटले होते की, चांडाळ अस्पृश्य आहेत. पण पुढे असे म्हटले होते की, चांडाळ कोण आहेत? आता आपल्याकडे चांडाळ सरासरी कुठे आढळत नाहीत. महाराष्ट्रात कुठे आहेत की नाही, ही शंकाच आहे. आपल्याकडे वेगळ्याच अस्पृश्य जाती आहेत. तर ही चांडाळ जात काय आहे? तर स्मृतीचे म्हणणे असे की, या जातीत स्त्री ब्राम्हण आहे व पुरुष शु द्र आहे आणि अशातून ज्याची निर्मिती झा लेली आहे, तेच चांडाळ आहेत. मग शास्त्रीजींचे म्हणणे असे की , जर अशा प्रका रे जर असेल तर ते कुठल्याच जाती मानत नाहीत आणि असे असेल तर ते शास्त्रास सुद्धा मान्य नाही . अशी शास्त्रीजींनी भूमिका घेतली.[viii] आणि वादविवादाच्या क्षेत्रात एक सांगितले पाहिजे, अक्षरश: त्याला शेकडो म्हणावेत इतके वाद या लोकांनी घातलेले आहेत. त्यातले जे महादेवशास्त्री दिवेकर आहेत, त्यांचे तर लेख वाचले तर आपल्याला आज सुद्धा दाभोलकरांची आठवण येईल , अशा प्रकारे अंधश्रद्धा निर्मूलनावर कठोर भाष्य केले. आता ही मुळची मंडळी शास्त्री परंपरेतून आली आहेत , पण तर्कतीर्थां सारख्या लोकांनी अक्षर श: वर्षानुवर्षे वेगवेगळया शास्त्री लोकांबरोबर वाद घातलेले आहेत. फक्त एकच उदाहरण घेऊ. काशीला एक मोठा वाद झाला होता. यात सुमारे ७०० पंडीतांमध्ये ही चर्चा चालू होती हा वाद आठ दिवस चालला. ५०० पंडीत भारत भरातून जमले होते, त्यातील तर्कतीर्थ आणि त्यां च्या बरोबर अजून काही लोक होते. हा जर गट

सोडला तर, बाकी सर्व गट प्रतिगामी बाजूने उभा राहिला होता. धर्मसुधारणेची बाजू याच छोट्या गटाने लढविली.[ix] तर्कतीर्थ त्यांचे नेते होते. अगोदर जो माणूस के वलानंदांच्या प्रभावाखाली हो ता, तो माणूस नंतर आगरकर, मिल्स, स्पेन्सर नंतर युरोपियन तत्त्वज्ञांच्या प्रभावात येऊ लागला. नंतर मार्क्सवादी झाला. नंतर ते रॉइस्ट गटात सामील झाले. असे त्याच्या जीवनात वेगवेगळे टप्पे आलेले आहेत.[x] तर इतके ते आधुनिक माणूस आहेत. त्यांची काही श्रद्धा नव्हती की, वेद अपौरुषेय आहेत आणि वाद शास्त्राधारीत झाले पाहिजेत. पण तो त्या लोकांना पटवून देण्यासाठी तसा वाद घालत होते. कारण प्रकार काय आहे की, वर्णव्यवस्था जर आपल्याला नष्ट करायची असेल तर तिचे पावित्र्य नष्ट केले पाहिजे. कारण ही पंडीत मंडळी असे समजतात की, ती पवित्र गोष्ट आहे. वर्णव्यवस्था संपली म्हणजे हिंदू धर्म संपला. तर पावित्र्य नष्ट के ले पाहिजे . याचा दुसरा एक अर्थ आहे, की माणूस चर्चेतून बदलू शकतात. चर्चा ही गोष्ट अशी असते, शेवटी की माणसं तशीच राहतील असे काही समजायचे कारण नाही. नाहीतर माणसे कधीच बदलणार नाही. नाहीतर आपल्या प्रबोधनाचा हेतूच काय आहे? माणूस बदलू शकतो. तो चर्चेने बदलू शकतो. त्यात 'धर्मनिर्णयमंडळ' स्वत: खूप कामे केलेली आहेत. वेगवेगळे निर्णय किंवा ठराव पास केले. वेगवेगळ्या परिषदा घेतल्या त्या परिषदेत वेगवेगळे ठराव पास केले . उदा . क्रमाने आधी वेदांचे अपौ रुषेयत्व त्यां नी काढून घेतले. वेद हे मनुष्य निर्मित आहेत. चूक कोणाकडूनही होऊ शकते. साधारण धर्म हे शाश्वत आहेत . म्हणजे सत्य, अहिंसा, सर्वही तभूतहितरती, म्हणजे आज समजा मला अस्पृश्यता पाळायची की नाही, हे मी कसे ठरवणार? तर यात सर्वहीतभूतरती नाही. म्हणजे निकष काय तर सर्वहीतभूतरती हे असले पाहिजे. म्हणजे हे सर्वच व्यक्तींविषयी तुम्हाला आत्मीयता वाटली पाहिजे . आणि त्या निकषाला बाधा येते आहे. म्हणून मी अस्पृश्यता आणि क्रमाने जाती व्यवस्था पळणार नाही. अशी भूमिका त्या लोकांनी घेतला आहे आणि त से ठराव पास केले. नंतर पुढच्या काळात आपल्याला असे दिसते की सर्व हिंदू परम्पर आधुनिक संहिताबद्ध झाला पाहिजे. हिंदू कोडबिल आणले पाहिजे असे ठराव या लोकांनी पास केले. नंतरच्या काळात नेहरूंच्या काळात हिंदू कोडबिलाला या लोकांनी मदत केलेली आहे. की, हिदू कोडबिल पास झाले पाहिजे. यासाठी या लोकांनी प्रचार केला. या लोकांनी खूप सारे लिखाण वगैरे केले आहे.[xi] उदा. आपल्याला माहिती आहे की, याच गटातले पा. वा. काणे फार मोठे पंडीत होते. त्यांनी 'हिस्ट्री ऑफ धर्मशास्त्रा'चे पाच खंड लिहिलेले आहेत. त्या पाच खंडांची योग्यता एवढी समजली जाते की, त्या मुद्द्यावर केवळ त्यांना भारतरत्न मिळाले होते.[xii] यावरून काय ते लक्षात येते. त्यांचे धर्मकोषाचे काम तर चालूच होते. म्हणजे धर्मकोषाचे खंड वगैरे तर निघतच होते. वेगवेगळ्या ठिकाणी चर्चा करणे, वेगवेगळ्या ठिकाणी प्रवचन देणे , वाद घालणे हे सर्व हे लोक करतच होते. यात सांगण्यासारखी एक गोष्ट अशी की नगर येथे एक परिषद भरली. त्या नगरच्या परिषदेत एक महत्त्वाचा निर्णय त्यांनी असा घेतला की , अनुभव आणि तर्क हे मिळून मानवाची बुद्धी सिद्ध होते. त्यामुळे आपण जे बदलाचे प्रमाण वापरतो , म्हणजे कोणतेही परिवर्तन जे आपल्याला करायचे आहे , त्याला काहीतरी प्रमाण असले पाहीजे. म्हणजे ते हेच प्रमाण असले पाहिजे. म्हणजे बुद्धीप्रामाण्य असले पाहिजे. म्हणजे शास्त्राचा आधार आम्ही घेणार नाही, असे नाही , घेऊ पण की एखाद्या गोष्टीला शास्त्राचा आधार नाहीच मिळाला तर काय करायचे? तर आम्ही बुद्धीचे प्रमाण घेऊ. आणि हे नगर येथे घडलेले आहे. हे एक विशेषत्वाने सांगितले पाहिजे. दुसरी गोष्ट पुनर्विवाहाचा ठराव याच नगरच्याच परिषदेत पास केला गेला. दुसरी गोष्ट सर्व हिंदू द्विज होऊ शकतात असा एक ठराव पास केला . म्हणजे द्विज म्हणजे ज्यांचे दोन जन्म झालेले आहेत, म्हणजे असे असते की, तुमचे यज्ञो पवीत धारण केले जाते. मौजी बंधन आहे. त्याचा पूर्वी फक्त ब्राम्हणांना अधिकार होता. प्राचीन काळी त्रैवर्णी कांना आधिकार होता, असे म्हटले जाते. पण व्यवहारात तो फक्त ब्राम्हणांना राहिला होता. त्यांनी सांगितले की नाही, मौजीबंधनाचा अधिकार सर्वांना असले पाहिजे. हा ठराव नगरच्याच परिषदेत या लोकांनी घेतला आहे.[xiii] म्हणजे ही मंडळी अभ्यास तर करतच होती. या लोकांनी प्रचंड अभ्यास केलेला आहे, यात शंकाच नाही. पण नुसता अभ्यासच करत नव्हते, तर त्याचा प्रत्यक्ष समाजाला काहीतरी उपयोगही झाला पाहिजे. यासाठी समाजात प्रत्यक्ष जाऊन कामही करत. आता हा सर्व जो गट होता, त्याचे नेतृत्व हे केव लानंदांनंतर तर्कतीर्थांकडे आले. खर तर तर्कतीर्थांच्या जीवनात खूप परिवर्तने झाली. एक तर त्यांना भरपूर आयुष्य लाभले. १९९४ ला ते वारले . सुमारे ९ ४ वर्ष आ युष्य त्यांना मिळाले . या काळात बघा की, एक असा पंडीत की ज्याला मराठी आणि संस्कृत शिवाय इतर भाषा येत नाहीत, सर्व शा स्त्रे प्रचंड तोंडपाठ परंतु बाहेरच्या जगाचे काही भान नाही. आणि क्रमाने बाहेरच्या जगाचे वारे लागते. आणि विनोबांचा प्रभाव पड तोय, गांधीजींचा प्रभाव पडतोय, पुन्हा मार्क्सवादाचा प्रभाव पडतो. 'हिदू धर्म स मीक्षा' नावाचे त्यांचे पुस्तक आहे. त्यातली भूमिका अशी आढळते की, हळूहळू धर्म नष्टच केला पाहिजे, त्याला दुसरा पर्याय नाही. नंतर पुढे जाऊन रॉईस्ट गटांत प्रवेश करतात. त्याही पुढे स्वत:ची भूमिका बदलत राहतात, आणि त्यांना असे वाटते की, नाही अगदीच धर्म सोडून चालणार नाही. म्हणजे विशेषत: साधारण धर्माच्या कल्पना ! आणि अध्यात्माच्या ज्या कल्पना आहेत, त्या आपल्याला सोडून चालणार नाहीत. असा बदल आपल्याला तर्कतीर्थांमध्ये झालेला दिसतो.

केवालानंदांपासून ते तर्कतीर्थांपर्यंचा हा प्राज्ञपाठशाळेचा विकास आहे. या काळात त्यांनी पारंपारिक हिंदू धर्मशास्त्रांपासून ते विविध आधुनिक दर्शनांचा अभ्यास केलेला दिसतो. तो सर्व अभ्यास समाजासाठी कसा कामाला येईल असा विचार त्यांनी केला. त्यातून समग्र हिंदू समाजाला आधुनिक बनवण्यासाठी त्यांनी कष्ट उपसलेले दिसतात. अशा प्रकारे प्राज्ञपाठशाळेने हिंदू समाजाच्या आधुनिकीकरण व पुनरुत्थान यात महत्त्वाची भूमिका बजावलेली दिसते.

---

[i] खंडकर अरुंधती, तर्कतीर्थ एक प्रज्ञाप्रवाह, श्रीविद्या प्रकाशन, १९९५, पृ. ९.

[ii] रेगे मे. पुं., स्वामी केवलानंद सरस्वती आणि प्राज्ञपाठशाळेची धर्मसुधारणेची चळवळ ( रेगे यांनी तर्कातीर्थांची घेतलेली मुलाखत) , *प्राज्ञपाठशाळा आणि तिची परंपरा*, संपादक अनुल्लेखित, प्रकाशन – प्राज्ञपाठशाळामंडळ, वाई, पृ. १०२

[iii] रेगे मे. पुं., स्वामी केवलानंद सरस्वती आणि प्राज्ञपाठशाळेची धर्मसुधारणेची चळवळ ( रेगे यांनी तर्कतीर्थांची घेतलेली मुलाखत) , *प्राज्ञपाठशाळा आणि तिची परंपरा*, संपादक अनुल्लेखित, प्रकाशन – प्राज्ञपाठशाळामंडळ, वाई, १९९६, पृ. ९७

[iv] मराठे ना. बा., धर्मकोशाची ५१ वर्षे (लेख), *प्राज्ञपाठशाळा आणि तिची परंपरा* , संपादक अनुल्लेखित, प्रकाशन – प्राज्ञपाठशाळामंडळ, वाई, १९९६, पृ.२३०

[v] जोशी लक्ष्मणशास्त्री, श्री गुरुवर्य केवलानंद सरस्वती (लेख), *प्राज्ञपाठशाळा आणि तिची परंपरा* , संपादक अनुल्लेखित, प्रकाशन – प्राज्ञपाठशाळामंडळ, वाई, १९९६, पृ. ५१

[vi] चव्हाण रा. ना., गु. केवलानंद सरस्वती व धर्मनिर्णयमंडळाचे कार्य (लेख), *प्राज्ञपाठशाळा आणि तिची परंपरा* , संपादक अनुल्लेखित, प्रकाशन – प्राज्ञपाठशाळामंडळ, वाई, १९९६, पृ. ७९

[vii] जोशी लक्ष्मणशास्त्री, श्री गुरुवर्य केवलानंद सरस्वती (लेख), *प्राज्ञपाठशाळा आणि तिची परंपरा* , संपादक अनुल्लेखित, प्रकाशन – प्राज्ञपाठशाळा मंडळ, वाई, १९९६, पृ. ५३

[viii] रेगे मे. पुं., स्वामी केवलानंद सरस्वती आणि प्राज्ञपाठशाळेची धर्मसुधारणेची चळवळ ( रेगे यांनी तर्कतीर्थांची घेतलेली मुलाखत) , *प्राज्ञपाठशाळा आणि तिची परंपरा*, संपादक अनुल्लेखित, प्रकाशन – प्राज्ञपाठशाळामंडळ, वाई, १९९६, पृ. १११ ते ११५

[ix] खंडकर अरुंधती, तर्कतीर्थ एक प्रज्ञाप्रवाह, श्रीविद्या प्रकाशन, १९९५, पृ. ७६ ते ८०

[x] रेगे मे. पुं. , वैचारिक वाटचाल (लेख) , *तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी : व्यक्ती, कार्य आणि विचार* , संपादक – पळशीकर वसंत, – प्राज्ञपाठशाळा मंडळ, वाई, १९९६, पृ. ८ ते १४

[xi] दफ्तरी के. ल., स्वतंत्र भारताचे गुरु (लेख), *प्राज्ञपाठशाळा आणि तिची परंपरा* , संपादक अनुल्लेखित, प्रकाशन – प्राज्ञपाठशाळा मंडळ, वाई, १९९६, पृ. ६२ ते ६५

[xii] मराठी विश्वकोश ऑनलाईन आवृत्ती, नोंद – *काणे पांडुरंग वामन*, https://vishwakosh.marathi.gov.in/16349/

[xiii] दफ्तरी के. ल., स्वतंत्र भारताचे गुरु (लेख), *प्राज्ञपाठशाळा आणि तिची परंपरा*, संपादक अनुल्लेखित, प्रकाशन – प्राज्ञपाठशाळा मंडळ, वाई, १९९६, पृ. ६० ते ६५